# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०६०/२००७ व अपील क्रमांक २०६१/२००७.

श्री. भिमराव गणाजी वानखेडे,
प्लॉट नं. २९, ठवरे कॉलोनी
नागपूर- ४४० ०२४. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्रीमती इंदूताई परतेकी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. श्रावण राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१०.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक २०६०/२००७ मध्ये दिनांक ५.६.२००७ रोजी राज्य शासकीय माहिती अधिकारी यांचेकडे मान्यता पत्र दिनांक १७.४.२००७ ते २७.४.२००७ ला पाठविलेल्या जावक रजिष्टरच्या पानाच्या झेरॉक्स प्रती मिळण्याबाबत. १) शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व शिक्षण सेवक यांचे मान्यता पत्र (कॅम्प) दिनांक १७.४.२००७ ते दिनांक २७.४.२००७ ला मान्यता पत्र पाठविलेल्या जावक

... २

रजिष्टरच्या पानाच्या झेरॉक्सच्या प्रती. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ५.७.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या अपीलाचे सुनावणीत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ५.६.२००७ च्या अजाचे अनुषंगाने दिनांक १४.६.२००७ रोजी माहितीसाठी येणारा खर्च रुपये २३२/- शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर येथील संबंधित लिपिकाकडे उपस्थित राहून द्यावा. जेणेकरुन सदर माहिती उपलब्ध करुन देणे सोईचे होईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक २१.७.२००७ रोजी माहिती अधिकारी यांना मी रुपये ११००/- चालनाद्वारे भरलेले आहेत. त्यापैकी मला फक्त आपल्या कार्यालयातून १२१ प्रती मिळालेल्या आहेत. त्यामुळे माझे पैसे आपल्या कार्यालयात जमा आहेत ती रशिद सोबत जोडलेली आहे. तरी कृपया आपण संदर्भ क्रमांक १ नुसार पाठविलेले पत्राद्वारे २३२/- रुपये जमा रक्कमेतून घेऊन मी मागितलेली माहिती द्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे माहिती घेण्यास आले नाही व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. वास्तविक अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे त्यांनी खर्चाचा भरणा कळविल्यानंतर माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता त्यांनी स्वतः हजर राहून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा दिनांक २१.७.२००७ रोजी त्यांना त्यांच्या दिनांक २३.४.२००७ च्या अर्जाच्या संदर्भात त्यांनी खर्चाचा भरणा केल्याबाबत व दिनांक ५.६.२००७ च्या अर्जातील माहितीच्या संदर्भातील एकत्रित खर्चाचा भरणा त्यांना कळविण्यात आला होता व उर्वरित रक्कम रुपये ६१६/- जमा असून सदर खात्यातून देयकाद्वारे काढण्याची कार्यवाही सुरु आहे. रक्कम प्राप्त होताच आपणास प्रदान करता येईल. परंतु सदर प्रकरणाचे निराकरण करण्याचे दृष्टिने दिनांक ३०.७.२००७ रोजी दुपारी ३.०० वाजता प्रथम अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली आहे असे कळविलेले दिसून येते व त्याही बाबतीत अपीलकर्ता हे उपस्थित न असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४.	अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक २०६१/२००७ मध्ये दिनांक २३.४.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे मान्यता कॅम्प एप्रिल, २००७ मधील शिक्षक, शिक्षण सेवक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मान्यतेच्या प्रती मिळण्याबाबत. माहितीचा कालावधी दिनांक १७.४.२००७ ते २५.४.२००७. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना सदरच्या माहितीसाठी लागणारा खर्च रुपये ११००/- शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर या कार्यालयातील रोखपाल श्री. घिमे यांचेकडे भरणा करावा व पावती या कार्यालयास सादर करावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये ११००/- चा भरणा केलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांना १२५ पानाऐवजी १२१ पृष्ठ अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उर्वरित रक्कमेच्या संदर्भामध्ये ती त्यांना परत करण्यात आली नाही किंवा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही या कारणास्तव त्यांनी प्रथम अपील दिनांक ५.७.२००७ रोजी दाखल केलेले आहे व द्वितीय अपील सुध्दा दाखल केलेले आहे.

५.	वास्तविक त्यांच्या दुस-या अर्जाचे संदर्भामध्ये त्यांना दिनांक १९.७.२००७ रोजी माहिती अधिकारी यांनी दिलेल्या पत्रामधील परिच्छेदात उल्लेख केल्याप्रमाणे कळविण्यात आलेले होते व त्याच वेळेस अपीलकर्ता यांनी उपस्थित राहून माहिती उपलब्ध करुन घेतली असती तर त्यांना उर्वरित रक्कम सुध्दा परत मिळाली असती असे दिनांक १९.७.२००७ च्या पत्रावरुन दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २०६०/२००७ व अपील क्रमांक २०६१/२००७ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना अपील क्रमांक २०६०/२००७ मधील माहितीचे पृष्ठ २३२ हे उपलब्ध करुन देऊन अपील क्रमांक २०६१/२००७ च्या संदर्भामध्ये भरणा केलेले रुपये ११००/- मधून उपलब्ध करुन दिलेली माहितीचा संपूर्ण खर्च वजा करुन उर्वरित रक्कम त्यांना हा निर्णय मिळाल्या पासून १५ दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता व उर्वरित खर्चाची रक्कम परत घेण्याकरिता मुळ चलान प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून उपलब्ध करुन घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १.१०.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/७१६-७१९/१.१०.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१०५/२००७.

श्री. सुधाकर मोतीरामजी कडू,
राजा कोठी, आमदार निवासच्या बाजूला,
सिव्हील लाईन, नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गोपीचंद राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपायुक्त - १,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. विजय कोल्हे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१०.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००७ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दिनांक १.४.२००५ ते ३०.४.२००७ च्या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. नागपूर महानगरपालिका नागपूरच्या सर्व विभागातील झालेल्या कामाचे देयक लेखा विभागात भूगतान करण्याकरिता जमा करतांना नोंदवहीत घेतलेल्या देयकाचा अनुक्रमांक, कंत्राटदाराचे नांव, कामाचे नांव, रक्कम व दिनांकासह देयके जमा केलेल्या नोंदवहीची छायांकीत प्रत तसेच त्या नोंदवहीतील देयके केंव्हा पास केली व ती पास करते वेळी घेतलेल्या नोंदवहीची छायांकित प्रत व देयके

... २

पास केल्यानंतर धनादेश देतांना घेतलेल्या नोंदवहीतील कत्राटदाराचे नांव, कामाचे नांव, धनादेशाची रक्कम, धनादेश क्रमांक व दिनांकाच्या नोंदवहीची छायांकित प्रत तसेच संगणकामध्ये देयकाची एन्ट्री केल्यानंतर निघालेल्या विवरणपत्राच्या प्रिन्टची छायांकित प्रत देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.६.२००७ रोजी प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना खालील प्रमाणे उत्तर दिलेले आहे. नागपूर महानगरपालिकेच्या सर्व विभागामार्फत दिनांक १.४.२००५ ते दिनांक ३०.४.२००७ या २ वर्षाच्या कालावधीत केलेल्या कामांच्या व सर्वच कंत्राटदारांना केलेल्या भुगताना बाबतची वर नमूद करण्यात आलेली मोठया प्रमाणावरील व व्यापक माहिती उपलब्ध करुन देणे अत्यंत अडचणीचे आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ७(९), कलम ९ व द फ्रिडम ऑफ इन्फॉरमेशन ॲक्ट, २००२ CHAPTER - II कलम ९ मध्ये नमूद केल्यानुसार आपण मागितलेली माहिती ही मोठया प्रमाणावरील व व्यापक स्वरुपाची असून सदर माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता मोठया प्रमाणावर साधन सामुग्री व मानवी श्रम लागणार असल्यामुळे ही माहिती उपलब्ध करुन देणे अत्यंत अडचणीचे आहे. करिता आपणास कळविण्यात येते की, आपण एखाद्या विशिष्ट कामाशी निगडीत किंवा एखाद्या विशिष्ट स्वरुपाच्या माहितीसाठी विनंती केल्यास त्या अनुषंगाने आपणास माहिती पुरवता येईल. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.६.२००७ रोजी देण्यात आलेला आहे व त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्या प्रमाणे एखाद्या विशिष्ट कामाशी निगडीत किंवा एखाद्या विशिष्ट स्वरुपाच्या माहितीसाठी विनंती केल्यास त्या अनुषंगाने माहिती पुरविता येईल व अशा प्रकारे माहिती मागितल्यास माहिती अधिकारी यांनी त्यांना नियमानुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिलेले असून अपील निकाली काढण्यात आल्याचे दिसून येते. सदरच्या निर्णयाने व्यथित होऊन अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितील अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलाचे सुनावणीचे वेळेस जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, उत्तरामध्ये जरी पृष्ठ संख्या दिलेली नसली तरी मागितलेल्या माहितीचे अंदाजे ४६ हजार देयकांचे प्रक्रियेच्या संदर्भामध्ये पुन्हा प्रत्येक देयकाचे शेकडो पृष्ठ आहेत अशा प्रकारची माहिती छायांकित प्रती करुन उपलब्ध करुन देणे हे अशक्य

... ३

असल्याने जनमाहिती अधिकारी यांनी उत्तर दिले व त्यातही माहिती अधिकारी हे केंव्हाही उपलब्ध करुन देण्यास तयार असल्याने गत वर्षाचे कामाचे संदर्भामध्ये माहिती मागितलेली असली तरी ती माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविण्यात आलेले आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ७.५.२००७ च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जनमाहिती अधिकारी यांचे युक्तीवादात तथ्य आहे असे दिसून येते. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे देयकांच्या नोंदवहया दाखविल्या व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे हे शक्य नाही असे आयोगाचे निदर्शनास आणले व त्यावरुनही जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. वास्तविक हे नियमाचे कलम ७(९) मध्ये माहिती जर अति व्यापक प्रमाणात असेल व ती माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्यास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यकच राहिल असे नाही व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. अपीलकर्ता हे विभागीय सदस्य (अशासकीय) शासकीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती, नागपूर विभाग, नागपूर असे आहेत असे दिसून येते व त्यामुळे कदाचित भ्रष्टाचार शोधून काढण्याकरिता त्यांनी अतिव्यापक प्रमाणात माहिती मागितलेली दिसून येते. वास्तविक अशी मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांना दिनांक ९.६.२००७ च्या पत्राप्रमाणे माहिती टप्याटप्याने विहित कालावधीत पुरविण्यात यावी अशी जी विनंती केलेली आहे ती विनंती सुध्दा अव्यवहार्य दिसून येते. एकतर मागितलेली माहितीची व्यापकता अपीलकर्ता हे लक्षात घेत नाहीत किंवा मागितलेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन देता येणार नाही याबाबतची कल्पना त्यांना असल्यामुळेच त्यांनी मोघम व्यापक माहिती मागितलेली दिसून येते व त्यावरुन माहिती मागण्याच्या उद्येश लक्षात येतो व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत दिलेले उत्तर हे योग्य असल्यामुळे व तसेच प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/७२०-७२३/१८.१०.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २०६६/२००७ व अपील क्रमांक २१०३/२००७.

श्री. मारोतराव विश्वनाथ मोते,
प्लॉट नं. २१, महालक्ष्मी नगर नं. १,
मानेवाडा रोड, नागपूर- ४४० ०२४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्र. २, नागपूर शहर,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
पाचपावली विभाग,
नागपूर शहर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१०.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००७ व दिनांक २३.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १८.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे रजेवर असल्यामुळे ते गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी श्री. सहारे, कनिष्ठ लिपिक यांना आयोगाचे पुढील कामकाजाचे चौकशीकरिता पाठविलेले आहे. वास्तविक अपील क्रमांक २०६६/२००७ ची सुनावणी दिनांक १.१०.२००८ रोजी ठेवण्यात आली होती. परंतु बंदोबस्ताचे कारणास्तव जनमाहिती अधिकारी यांनी मुदत मागितली व म्हणून दिनांक १८.१०.२००८ रोजी त्यांना पुढील तारीख देण्यात आली होती. असे असून सुध्दा आज जनमाहिती अधिकारी हे वैद्यकीय रजेवर असल्यामुळे त्यांचे ऐवजी प्रभारी जनमाहिती अधिकारी यांना हजर राहणे आवश्यक होते. राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(५) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी जनमाहिती अधिकारी यांचेवर अधिनियमाच्या कलम १९(५) प्रमाणे आहे याची

... २

जाणीव संबंधित जनमाहिती अधिकारी, संबंधित प्रथम अपीलीय अधिकारी किंवा संपूर्ण पोलीस खात्याला दिसत नाही. आयोगापुढे सुनावणीस हजर न राहणे हा आयोगाचा अवमान आहे व त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी लिपीक यांना पाठवून आयोगाचा अवमान केलेला आहे. पोलीस आयुक्त यांनी आयोगाचा दर्जा अधिनियमाच्या कलम १६(५) प्रमाणे काय आहे याची जाणीव त्यांना खात्याला करुन देणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे त्यांच्या अधिकाऱ्यांना आदेश देणे आवश्यक आहे असे दिसून येते. आयोगाने पोलीस खात्याच्या सोई प्रमाणे तारीख द्यावीत मात्र पोलीस खात्याने बेजबाबदारपणे वागावे असे दिसून येते.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक २०६६/२००७ मध्ये दिनांक ६.१.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली यांचेकडे खालील प्रमाणे एकूण १३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. १) पोलीस निरिक्षक श्री. पाली हयांनी हया प्रकरणाच्या चौकशी अंती वरिष्ठांना पाठविलेल्या अहवालाची प्रत. २) पोलीस निरिक्षक श्री. पाजी हयांनी गु. र. नं. ३०१४/०६ कलम ३/७ EC Act मध्ये पाठविलेल्या दोषारोप पत्राची प्रत व cc नंबर, तारीख व कोर्टाचे नांव. ३) पोलीस कॉन्टेबल सुधीर ब.नं. ४८८० हयाने दिनांक १०.२.२००४ रोजी CA ऑफीसमधून ज्या १० CA रिपोर्ट पोलीस स्टेशन आणल्यानंतर ज्या आवक रजिष्टरमध्ये नोंद घेतली. त्या रजिष्टरचे त्या नोंदीच्या अगोदरच्या ४ व नंतरच्या ४ पानाच्या नोंदीच्या सत्यप्रतिलिपी. ४) मुद्येमाल हे ३ मोहरर व मदतगार पो.का. सुधीर हे त्यांना CA रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतर, संबंधितांना दिल्यानंतर त्यांची मिळाल्याबाबतची स्वाक्षरी ज्या टपाल बुकात अथवा रजिष्टर मध्ये घेत होते. त्याच्या दिनांक १.२.२००४ ते २०.२.२००४ पर्यंतच्या पानांची सत्यप्रतीलिपी. ५) मुद्येमाल रजिष्टर २००४ मधील मुद्येमाल क्रमांक १८० ते २१० पर्यंतच्या नोंदी असलेल्या संपूर्ण पानांची सत्यप्रतिलिपी. ६) दिनांक १.२.२००४ ते २०.२.२००४ पर्यंत (पोलीस स्टेशन, पाचपावली) (अ) बारनिशी कर्मचाऱ्यांचे पोलीस स्टेशन मधील अधिकारी व कर्मचारी हयांना टपाल वाटप करुन त्यांची स्वाक्षरी घेतली. त्या टपाल बुकाच्या वरील तारखे दरम्यानच्या पानांची सत्यप्रतिलिपी. (ब) क्राईम रायटरने पोलीस स्टेशन मधील अधिकारी व तपासी अमलदारांना तपासकामी गुन्हयांच्या डायऱ्या अथवा इतर टपाल देऊन त्यांची स्वाक्षरी घेतली त्या टपाल बुकाच्या वरील तारखे दरम्यानच्या पानांची सत्यप्रतिलिपी. (क) स्टेशन रायटरने पोलीस

स्टेशन मधील अधिकारी व तपासी अंमलदारांना स्टेशन डायरी गुन्हे/अर्ज पुढील कार्यवाहीसाठी वाटप करुन ज्या टपाल बुकावर त्यांची स्वाक्षरी घेती त्या टपालबुकाच्या वरील तारखे दरम्यानच्या पानांची सत्यप्रतिलिपी. ७) दिनांक ५.१०.२००३ ते १५.६.२००४ दरम्यान मा.पोलीस उपआयुक्त परी. २ व मा. पोलीस आयुक्त, सदर विभाग हयांनी दिलेल्या भेटीचे/निरीक्षणाचे वेळी हया प्रकरणातील संबंधित मुद्येमाल अथवा CA रिपोर्ट प्राप्त करण्याबाबत काही सूचना दिल्या असल्यास किंवा त्यांच्या निरीक्षण टिप्पणाचे काही उल्लेख केला असल्यास त्यांच्या प्रतिलिपी. ८) दिनांक २४.१२.२००५ ते ३१.१२.२००६ पर्यंत सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली हयांनी पोलीस स्टेशन, पाचपावली येथे दिलेल्या भेटीचे दरम्यान/निरीक्षणाचे वेळी EC Act मधील प्रलंबित CA रिपोर्ट प्राप्त करणे कामी दिलेल्या लेखी सूचना अथवा लेखी नोंदीची सत्यप्रतिलिपी अथवा मुद्येमाल रजिष्टरवर हयासंबंधात काही नोंदी केल्या असल्यास त्याच्या सत्यप्रतिलिपी. ९) दिनांक ७.१०.२००४ रोजी स्टेशन डायरी नोंद क्रमांक ४१ वर PC ४८८० व HC १६०७ हयांची रवानगी आहे. त्यांनी वापसी केलेल्या दिनांक ७.१०.२००४ च्या स्टेशन डायरीची पानाची सत्यप्रत. १०) मी दिनांक २९.४.२००३ ते ११.६.२००४ दरम्यान स.पो.नि. पोलीस स्टेशन, पाचपावली म्हणून नेमणूकीस होतो. त्या दरम्यान माझा रायटर म्हणून पोलीस शिपाई राजेंद्र धोपटे ४६६१ हा कोणत्या तारखेपासून माझा रायटर म्हणून काम पाहत होता. ११) क्रमांक ३ मध्ये उल्लेखित CA रिपोर्ट आवक रजिष्टर हे कोणत्या तारखेपासून सुरु करण्यात आले होते. त्यात कोणत्या तारखे पर्यंत नोंदी आहेत ते प्रमाणित करुन घेतले होते काय ? असल्यास कोणी प्रमाणित केले होते व त्यात किती ते किती पेज क्रमांक आहेत. १२) दिनांक १.२.२००४ ते २०.२.२००४ पर्यंत पोलीस स्टेशन, पाचपावली येथे कार्यरत क्राईम, बारनिशी व स्टेशन डायरी रायटरची नांवे व बं.नं.ची माहिती. १३) हे. कॉ. १६०७ हयांचे नांव. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.१.२००७ रोजी रुपये १४६/- चा भरणा करण्यात आल्याचे दिसून येते. त्याप्रमणे दिनांक १९.१.२००७ रोजी खर्चाचा भरणा अपीलकर्ता यांनी केलेला दिसून येतो. माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी ही अपीलकर्ता यांची नाही असे असले तरी जनमाहिती अधिकारी किंवा जबाबदार अधिकारी गैरहजर असल्यामुळे सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना विचारणा करण्यात आली व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी सांगितले की त्यांना मुद्या ४ ची माहिती त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याकरिता त्यांनी दिनांक ९.२.२००७ रोजी सुध्दा अर्ज करुन

जनमाहिती अधिकारी यांचे निदर्शनास ही बाब आणली होती. परंतु दिनांक १५.२.२००७ रोजी चुकीचे उत्तर देण्यात आले असे त्यांचे म्हणणे आहे. पुन्हा त्यांनी दिनांक १९.२.२००७ रोजी त्या मुद्यांच्या संदर्भामध्ये अर्ज केलेला होता व त्याप्रमाणे दिनांक १.३.२००७ रोजी रुपये ९०/- चा खर्चाचा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते म्हणजे एकाच वेळेस माहिती उपलब्ध करुन दिली नाही यावरुनही मुळ दिनांक ६.१.२००७ रोजीच्या अर्जा मधील माहिती प्रमाणे ही चुकीची व दिशाभूल करुन माहिती दिली होती हे सिध्द होते. त्यानंतरही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती ही चुकीची दिलेली आहे व म्हणून त्यांनी दिनांक ७.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देतांना माहिती त्यांना योग्य ती दिलेली दिसून येत नाही किंवा दिलेली नाही व मुद्या क्रमांक ४ ची माहिती त्यांना अजूनही प्राप्त झाली नाहीव त्यामुळेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कागदपत्राच्या स्वरुपात छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. परंतु जी कागदपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत त्यावरुन प्रत्येक वेळेस माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे त्यावरुन कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्या ऐवजी प्रश्नाची उत्तरे दिलेली दिसून येतात व त्यावरुन अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक ६.१.२००७ रोजी माहिती ही उपलब्ध झाली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहेत. परंतु आज संबंधित जनमाहिती अधिकारी हे आयोगापुढे नसल्याने त्यांचे म्हणणे आयोगास ऐकून घेता आलेले नाही त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

३. अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २१०३/२००७ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.५.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली यांचेकडे खालील प्रमाणे एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. १) मी CA कडे दिनांक ७.१०.२००३ रोजी माल पाठविला होता व दिनांक १४.६.२००४ रोजी माझी बदली झाली. हा कालावधी फक्त ८ महिन्याचाच होतो करिता १३ महिने कोणत्या आधारावर गणण्यात आले हयाची माहिती पुरवावी. २) पाठपुरावा केला नाही म्हणून हेतुपुरस्पर तसे केले असा आपण निष्कर्ष काढला. तेंव्हा पाठपुरावा करण्याबाबत पोलीस नियमावली/अधिनियम/शासकीय किंवा पोलीस महासंचालक यांचे किंवा इतर कोणतेही परिपत्रके/स्टॅण्डिग ऑर्डर निश्चितच असतील करिता

... ५

त्यांच्या प्रती पुरवाव्या. नसतील तर तसे कळवावे. ३) आपण माहितीच्या अधिकारान्वये मला पुरविलेली EC Act च्या गुन्हयासंबंधीची माहितीची प्रत हयासोबत जोडलेली आहे. त्यात दिनांक २२.४.२००३ ते १.१२.२००४ हया कालावधीत एकूण १५ गुन्हे दाखल आहे. त्यात अद्यापपर्यंत CA रिपोर्ट प्राप्त झाला नाही व तो प्राप्त करण्याकरिता त्यांच्या तपासी अंमलदारानी कोणताही पाठपुरावा केला नाही असे नमुद आहे. तेंव्हा त्यांच्या विरुध्द आपण अशाच कारवाईची शिफारस केली असल्यास, त्याबाबतची माहिती व त्यांच्या सत्यप्रती पुरवाव्या. कारवाईची शिफारस केली नसल्यास तसे कळवावे. ४) पोलीस नियमावली भाग-३ च्या नियम २८ मध्ये आयुक्तालयातील सहाय्यक पोलीस आयुक्तांची कर्तव्ये नमुद केली आहे. (सुलभ संदर्भाकरिता त्याची प्रत जोडून सादर केली आहे) त्याचे अवलोकन केल्यास त्यात नमुद आहे की, पोलीस ठाण्यांना भेटी देतील व त्यांची तपासणी करतील तेंव्हा त्यांनी पोलीस ठाण्यातील मुद्येमालाची प्रत्यक्ष तपासणी करावी. तेंव्हा आपण दिनांक २४.१२.२००५ ते ३.५.२००७ पर्यंत सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली म्हणून नेमणूकीस असता पोलीस स्टेशन, पाचपावली येथील मुद्येमालांची केलेली प्रत्यक्ष तपासणी, त्या संबंधात पोलीस निरिक्षक, पाचपावली व हेड पो. हयांना दिलेल्या लेखी सुचना व हयासंदर्भात वरिष्ठाकडे पाठविलेले अहवाल हयांच्या सत्यप्रती पुरवाव्या. मुद्येमालाची तपासणी केली नसल्यास तसे कळवावे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २८.५.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु सदरची माहिती सुध्दा ही चुकीची व दिशाभूल करणारी आहे असे त्यांचे म्हणणे आहे व त्याकरिता त्यांनी दिनांक १३.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर त्यांना दिनांक ५.७.२००७ रोजी पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन मुळातच त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नव्हती असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. वर नमुद केल्याप्रमाणे हया अपीलात सुध्दा योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी ही जनमाहिती अधिकारी यांची अधिनियमाचे कलम १९(५) प्रमाणे असल्यामुळे परंतु जनमाहिती अधिकारी हे आज हजर नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे ग्राहय धरणे आवश्यक आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोषी आहेत व अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे शास्तीस पात्र आहेत व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे. मात्र त्यांचे विरुध्द शास्ती कां लावू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी १० दिवसांत आयोगाकडे करणे आवश्यक राहील.

... ६

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २०६६/२००७ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ६.१.२००७ च्या अर्जातील मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये उपलब्ध असलेली कागदपत्राची छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावे. अपीलकर्ता यांनी सदरची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून व्यक्तिशः १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ६.१.२००७ च्या अर्जाप्रमाणे मुद्या क्रमांक ४ ची माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी दिलेली असल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी हे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०००/- ची शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांनी १० दिवसाचे आंत आयोगापुढे करावा.

३) अपील क्रमांक २१०३/२००७ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १९.५.२००७ च्या अर्जामधील चारही मुद्यांच्या संदर्भामध्ये उपलब्ध असलेली कागदपत्रांचे छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावेत. अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत व्यक्तिशः जनमाहिती अधिकारी यांचे कडून सदरची माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

४) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दिनांक १९.५.२००७ च्या अर्जाप्रमाणे चुकीची व दिशाभूल करुन माहिती दिलेली आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे असल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०००/- ची शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून त्यांनी १० दिवसाचे आंत आयोगापुढे सादर करावा अन्यथा शास्ती कायम होईल.

५) सदरच्या निर्णयाची एक प्रत पोलीस आयुक्त, नागपूर यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १८.१०.२००८**

HIREKHAN/BHUJI/७२४-७२९/१८.१०.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१०६/२००७.**

श्री. राजू किसन वानखेडे,
श्रीराम वार्ड,
ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुर्वे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, धनवटे चेंबर,
सिताबर्डी, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
व्यवस्थापक,
चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती को-ऑप. बँक मर्यादित,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.१०.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. आर. एन. कुळकर्णी, सहाय्यक व्यवस्थापक हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००७ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती को-ऑप. बँक मर्या. चंद्रपूर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) कोणत्या तारखेला खाजगी शाळेचे पगारपत्रके बल्लारपूरच्या शाखेत गेलीत ? २) बल्लारपूरच्या शाखेला किती दिवस पगार पत्रके ठेवायचा अधिकार आहे ? ३) माझे पत्नीला मी दिनांक ३.३.२००७ रोजी पगार काढून आणणेसाठी आपले

... २

बल्लारपूरच्या शाखेत पाठविले असता आज पगार होत नाही सोमवारी मिळणार असे सांगून वापस का केले. (विड्रॉल फार्म झेरॉक्स) ४) दिनांक ३.३.२००७ ची माहिती फक्त खाजगी शाळेच्या पगाराबाबत खालील तक्त्यानुसार द्यावी.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नांव | शाळा/ महाविद्यालयाचे नांव | टोकन क्रमांक | खाते क्रमांक | पान क्रमांक | लेजर क्रमांक | असलेला पगार रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

५) आपल्या बँकेच्या कोणत्या जी. आर. नुसार फक्त ठराविक कर्मचारींना (खाजगी शाळा) चेहेरा पाहून दिनांक ३.३.२००७ ला होळीच्या पावन पर्वावर पगार देण्यात आला ? (पगार वाटपाबाबत आपल्या बल्लारपूर शाखेचा दिनांक द्यावा) सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १२.६.२००७ रोजी प्रथम अपील विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ६.८.२००७ रोजी अर्जदार उपस्थित नसल्यामुळे तसेच गैरअर्जदार यांनी अर्जदाराला माहिती दिली असल्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो व सदरच्या निर्णयाचे विरुध्द अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, माहिती मिळाली होती परंतु ती विलंबाने दिनांक ४.८.२००७ रोजी मिळाली असल्यामुळे दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती विलंबाने कां उपलब्ध करुन दिली असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही शाखेकडे असल्यामुळे शाळेला माहिती उपलब्ध करुन द्या असे दिनांक ८.३.२००७ रोजी पत्र दिले होते. त्यामुळे शाखेच्या अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास विलंब केला असे त्यांचे म्हणणे आहे. शाखा अधिकाऱ्यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला हे खरे आहे. परंतु माहिती तयार होती तसेही तोंडी अपीलकर्ता यांना सांगितले होते. अर्थातच अपीलकर्ता त्याबाबत बोलण्यास तयार नाही. वास्तविक अपीलकर्ता यांचे बँकेत खाते असल्याने नेहमीच बँक अधिकाऱ्यांशी

... ३

संबंधित दिसतात माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता विलंब झाला त्यामुळे त्यास संबंधित शाखा अधिकारी हे जबाबदार दिसून येतात व त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांचे सहाय्य घेतले असेल त्यांना अधिनियम कलम ५(५) प्रमाणे जनमाहिती अधिकारी समजण्यात येते व त्यामुळे विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यास शाखा अधिकारी हे दोषी आढळून येतात. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात आलेले आहे. परंतु प्रथम अपील हे ३० दिवसाचे वर विशिष्ट परिस्थितीत ४५ दिवसांत सुनावणी घेऊन व तसा निर्ण दिलेला नसल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांना ताकीद देणे आवश्यक आहे. शाखा अधिकारी यांना शास्तीबद्यल विचारले असता त्यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता हे आमचे खातेदार आहेत व ते नेहमीच आमच्याकडे येत असतात व जी माहिती उपलब्ध करुन दिली ती मुद्याम देण्याची टाळाटाळ केलेली नाही. परंतु अपीलकर्ता हे जरी खातेदार असले तरी त्यावेळीच माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्याकरिता शाखा अधिकारीच दोषी आढळून येतात. अपीलकर्ता यांचा आग्रह आहे की, शाखा अधिकारी यांना शास्ती झाली पाहिजे व शास्ती होत नसल्यास ते आयोगाकडे अपील दाखल करणे बंद करतील याचा अर्थ त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ त्यांचा माहिती मागण्याचा व्यवसाय सुरु केलेला दिसून येतो पुर्वी सुध्दा अपीलकर्ता यांनी आयोगाकडे पुष्कळ अपीलांची सुनावणी झालेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून माहिती उपलब्ध करुन देण्यास जे शाखा अधिकारी जबाबदार आहेत त्यांना जनमाहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये २५०/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्तीची वसूली बँक व्यवस्थापकांनी करावी व लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" मध्ये जमा करुन तसे आयोगास कळवावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- १८.१०.२००८**

HIREKHAN/BHUJI/७३०-७३२/१८.१०.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१८७/२००७.

श्री. लक्ष्मण उपासराव पोटे,
लालगंज, मेहंदीबाग रोड,
पोष्ट ऑफीस समारे,
जावेद सायकल स्टोर्सच्या मागे,
नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक २,
नागपूर शहर, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
पाचपावली विभाग,
नागपूर शहर, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१०.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत व जनमाहिती अधिकारी विना अनुमती गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.५.२००७ रोजी (३.५.२००७) शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पाचपावली, नागपूर यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) स्टेशन डायरी अनुक्रम नंबर प्रमाणे लिहिण्यात येते की, एकाच नंबरने दोनदा नोंदी घेण्यात येते. २) स. पो. आ. गोरे यांचे आठवडा डायरी दिनांक १८.२.२००७, दिनांक १९.२.२००७ ची सत्यप्रत. ३) पी. एस. आय.

... २

काळबांडे यांची नेमणूक तारीख ते प्रोबेशनर म्हणून कधी रुजु झाले. ४) त्यांचा १२ महिण्याचे प्रशिक्षण कालावधी कधी संपला, प्रशिक्षणावर प्रात्यक्षिक प्रशिक्षण त्यांनी कोठे कोठे प्रात्यक्षिक प्रशिक्षण घेतले. दिनांक २९.५.२००७ रोजी ते प्रोबेशनर पी.एस.आय. म्हणून नेमणुकीस होते काय ? ५) पोलीस नियमावली भाग २ नियम १११ मधील तरतुदी प्रमाणे प्रात्यक्षिक पूर्ण केले काय ? ६) प्रोबेशनर अधिकाऱ्यांकडून नियमातील तरतुदीनुसार प्रशिक्षण पूर्ण करुन न घेता ए. सी. पी. ऑफीस मध्ये त्यांना कशाचे प्रशिक्षण देण्यात आले. ७) अपील क्रमांक ३१४८/२००६ हया गुन्हयांचा तपास पूर्ण झाला असल्यास ए. सी. पी. कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांना कधी परत करण्यात आले. केले नसल्यास त्यांना थांबवुन ठेवण्याचे कारण काय ? ८) पी. एस. आय. काळबांडे यांची रिडर म्हणून कोणी नेमणूक केली. प्रोबेशनर पी. एस. आय. ची रिडर म्हणून नेमणूक करता येते काय ? नेमणूक केली असल्यास त्या आदेश पत्राची प्रत द्यावी. ९) स्टेशन डायरीमध्ये एकाच नंबरची नोंद पुन्हा पुन्हा घेणे, क्रमांक वेगळे, वेळ वेगळी अशा नोंदी असल्यास आपल्या कार्यालयाकडून संबंधित पोलीस स्टेशनच्या संबंधितावर काय कारवाई करण्यात आली त्याबाबत अभिलेख द्यावा. १०) अशा नोंदीमुळे संशयास्पद मुद्ये निष्पन्न झाल्यास काही हेराफेरी झाल्याची संभावना दिसून येते या मताशी सहमती आहे काय ? ११) पी. एस. आय. काळबांडे यांचे आठवडा डायरीची सत्यप्रत दिनांक २९.५.२००७ ते १९.२.२००७. १२) दिनांक १९.२.२००७ रोजी माझा पाचपावली ठाण्यामध्ये पोलीस कॉन्सटेबल मंगेश याने घेतलेल्या बयानाची सत्यप्रत द्यावी. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.५.२००७ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना एकूण १२ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेली आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २४.७.२००७ रोजी देण्यात आला असून पुन्हा एकूण ९ प्रश्नांच्या मुद्यांचे उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अपीलाचे सुनावणीच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचे विरुध्द दिनांक १९.२.२००७ रोजी एफ.आय.आर. दाखल झालेला असल्यामुळे

... ३

अपीलकर्ता यांना एफ. आय. आर. च्या संबंधी चौकशी अधिकाऱ्यांची माहिती प्रश्नउत्तराचे माध्यमातून मागितलेली आहे व तरीही मुद्यांचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना त्यांच्या विरुध्द दाखल झालेल्या एफ. आय. आर. च्या संदर्भामध्ये कागदपत्रांची माहिती न मागता अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची किंवा बदलीची किंवा प्रशिक्षणाबद्यलची माहिती मागितली असून कोणत्याही प्रकारचा अधिकार नसतांना अधिकाऱ्यांवर कार्यवाही केली काय, संशयास्पद मुद्ये उपस्थित झाले असल्याने काही हेराफेरी झाल्याची संभावना दिसते अशा प्रकारचे प्रश्नाचे माध्यमातून जनमाहिती अधिकारी यांना अभिप्राय मागितलेला दिसून येतो. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) प्रमाणे "माहिती" या संज्ञेची व्याख्या केलेली आहे व त्या व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणामधील ज्या साहित्याच्या स्वरुपात कागदपत्रे, अभिलेख, टिप्पणी, परिपत्रके, इत्यादींची माहिती उपलब्ध असेल त्यांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे असा माहितीचा अधिकार आहे. त्यात कोणत्याही प्रकारे जनमाहिती अधिकारी यांचे अभिप्राय येतील अशा प्रकारची माहिती मागणे अपेक्षित नाही व त्यामुळे प्रश्नोत्तर माहिती मागितल्यावर व त्याचे उत्तर दिल्यावर त्या उत्तरामधून प्रश्न उपस्थित करुन माहिती मागितली जाते व ती अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती मिळालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १.५.२००७ (३.५.२००७) च्या अर्जा प्रमाणे दिनांक २८.५.२००७ रोजी व दिनांक २५.६.२००७ रोजीच्या प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे दिनांक २४.७.२००७ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/७३३-७३५/२१.१०.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१८८/२००७.

श्री. निलेश भिमराव केळझरे,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ,
भानखेडा, पो. मोमीनपूरा, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. डि. एम. मेहर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना विभाग,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१०.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर असून त्यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे खालील प्रमाणे एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसते. माहितीचा कालावधी सन २००५-२००७ पर्यंत असा आहे. १) महानगरपालिका नगर रचना विभागामध्ये सध्या कोणत्या प्रकारची कामे होतात ? त्याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी ? २) सध्या प्रत्येक झोनमध्ये इमारत विभाग शिफ्ट झालेले आहेत. तेंव्हा नगररचना मुख्यालयामध्ये व झोन मधील इमारत विभाग या दोन्ही

मध्ये कोणकोणत्या प्रकारची कामे केली जातात ? ३) सध्या नगर रचना विभागामध्ये एकूण किती चपराशी, लिपिक, मोहरीर, ट्रेसर, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, कनिष्ठ अभियंता, उपविभागीय अभियंता आहेत ? त्यांची पुर्ण नांव, पदनाम व सध्या त्यांचेकडे कोणती कामे आहेत याची विस्तृत माहिती देण्यात यावी ? ४) ट्रेसर कर्मचाऱ्यांना स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाची कामे करण्याचे व स्वाक्षरी करण्याचे आदेश तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कर्मचाऱ्यांना कनिष्ठ अभियंता पदाची कामे करण्याचे व स्वाक्षरी करण्याचे अधिकार कोणी दिले ? तसे मा. आयुक्तांचे आदेश आहेत काय ? असल्यास त्याची प्रत देण्यात यावी ? ५) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांना कनिष्ठ अभियंता पदाची १०% पर कामे करण्याचे अधिकार कोणी दिले ? या आयुक्तांनी दिलेले आहेत काय ? असल्यास त्याची प्रत देण्यात यावी ? ६) नगर रचना विभागामध्ये एकूण किती ट्रेसर आहेत व ते रोज किती नकाशे ट्रेसिंग करतात. मागील २ वर्षात त्यांनी किती नकाशे ट्रेसिंग केलेत त्याची विस्तृतपणे माहिती देण्यात यावी. ७) नगर रचना विभागामध्ये (एन.ओ.सी.) नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता किती दिवस लागतात ? व एन. ओ. सी. प्राप्त करण्याकरिता कोणत्या प्रकारची कागदपत्रांची आवश्यकता असते ? तसेच या विभागाद्वारे किती प्रकारची एन. ओ. सी. दिली जातात त्याची सुध्दा विस्तृतपणे माहिती देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.७.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना दिनांक २१.५.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे तसेच दिनांक २५.६.२००७ रोजी सुध्दा त्यांना अप्पर आयुक्त तथा अपीलीय अधिकारी यांचे समक्ष मुद्या क्रमांक ४ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेली दिसून येते. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याचे कारण जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, मागितलेली माहिती ही वेगवेगळया शाखा व विभागातील असल्यामुळे संकलीत करण्यास विलंब झाला. तसेच माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे व अपीलकर्ता हे नंतर माहिती घेण्यास आलेले नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला आहे. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना

संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे असे दिसून येते. द्वितीय अपीलामध्ये पहिल्या अपीलामध्ये योग्य न्याय मिळाला नाही अशी विनंती केलेली आहे. परंतु त्याबाबत स्पष्ट कारण दिलेले नाही व आज अपीलकर्ता सुनावणीचे वेळेस हजर नाही व त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा सादर केलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे या कारणासाठी सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/७३६-७३८/२१.१०.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१९१/२००७ व अपील क्रमांक २१९२/२००७.

श्री. अनिल लालसिंग चौहान,
द्वारा - जनार्दन सनके,
७०, पटेल नगर मज्जिद,
बोरगांव, नागपूर- ४४० ०१३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. गोपीचंद राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
निगम उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. डॉ. मिलींद गणविर,
जनमाहिती अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी ,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
अतिरिक्त उपायुक्त (१) (सा.प्र.वि.),
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१०.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर असून उत्तरवादी हजर आहेत.

... २

२.        अपीलकर्ता यांना दोनही अपीलाचे संदर्भामध्ये माहिती उपलब्ध झाली असून दिनांक १८.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी मला जी माहिती नागपूर महानगरपालिकेकडून पाहिजे होती ती संपूर्ण माहिती जनमाहिती अधिकारी यांनी मला सध्या दिलेली असल्यामुळे आता मला त्याची आवश्यकता नाही. करिता उपरोक्त सुनावणी अर्ज रद्य करण्याबाबत अर्ज दिलेला असल्यामुळे व जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आज हजर राहून आयोगापुढे सांगितले असल्यामुळे व तसे कागदपत्रे दाखल केलेली असल्यामुळे सदरची दोनही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

**नागपूर**

**दिनांक :- २१.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/७३९-७४०/२१.१०.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१९३/२००७.

श्री. शैलेश माणिकराव हुमणे,
५६/२, पहिला माळा,
कुकडे- ले- आऊट,
पो. भगवाननगर, नागपूर - ४४० ०२७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. बी. शेल्टे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
नागपूर विभाग, सदर, नागपूर.

श्री. सुनिल वारे,
जनमाहिती अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
पहिला माळा, प्रशासकीय भवन, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१०.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता विना अनुमती गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.४.२००७ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज अधिकारी, नागपूर यांचेकडे सन १९९१ ते २००७ च्या कालावधीची माहिती खालील प्रमाणे मागितलेली दिसून येते. १) विशेष जिल्हा समाज कल्याण कार्यालय मध्ये माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ पोटकलम (३) प्रमाणे शिष्यवृत्तीची माहिती जनतेस सहजपणे मिळेल अशा नमुन्यात व अशा रीतीने माहिती तयार करुन ठेवण्यात आली आहे का ? याचे स्पष्टीकरण, माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम

... २

५, पोटकलम (१) अन्वये पदनिर्देशित शासकीय माहिती अधिकारीने द्यावे. २) विशेष जिल्हा समाज कल्याण विभागामार्फत, शासनाने मंजूर करुन दिलेली शिष्यवृत्तीच्या अभिलेख (रेकॉर्ड) आपल्या कार्यालयात कशा प्रकारे नियंत्रण करतात, तसेच नियंत्रण करुन ठेवण्याची पध्दत कशी, याची योग्य व संपूर्ण माहिती. ३) विशेष जिल्हा समाज कल्याण विभागा मार्फत, दिली जात असलेली शिष्यवृत्ती योग्य व गरजु विद्यार्थी यांना मिळत आहे किंवा नाही, हे समाज कल्याण विभाग शिष्यवृत्ती मंजूर करत असतांना शहानिशा तसेच तपासून घेते का ? कशा प्रकारे तपासून घेते, तपासून घेण्याची रीत कशी ? याची योग्य व संपूर्ण माहिती. ४) समाज कल्याण विभागाकडून, शिष्यवृत्ती प्राप्त करण्याकरिता विद्यार्थी योग्य माहिती व दस्तावेज देऊन या शासनाची दिशाभूल करत नसल्याचे, समाज कल्याण कशा प्रकारे शोध तसेच खात्री करुन घेते, याची योग्य व संपूर्ण माहिती. ५) समाज कल्याण विभागाकडून, शिष्यवृत्ती प्राप्त करण्याकरिता एकाच विद्यार्थीने समाज कल्याण मार्फत, एकाच वर्गात निरनिराळया शाळा कॉलेज मधून शिष्यवृत्ती घेतली किंवा नाही याची माहिती समाज कल्याणला कशा प्रकारे मिळते. तसेच समाज कल्याण स्वतःच्या अभिलेख (रेकॉर्ड) वरुन कशा प्रकारे शोध/खात्री करुन घेतात की अर्जदार विद्यार्थीला प्रथमदाच व योग्यपणे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली आहे याची योग्य व संपूर्ण माहिती. ६) शासनाकडून संबंधित कॉलेज व शाळेला, समाज कल्याण विभागाकडून शिष्यवृत्तीचे धनादेश प्राप्त झाल्यानंतर, सदर धनादेशला शाळा व कॉलेजच्या शिष्यवृत्तीच्या खात्यात जमा करतात किंवा नाही याबाबतची खात्री समाज कल्याण विभागाकडून करुन घेण्यात येते काय ? कशा प्रकारे करुन घेण्यात येते, याची रीत कशी याची योग्य व संपूर्ण माहिती. ७) शासन जी शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना मंजूर करते, ती रक्कम संबंधित कॉलेज व शाळा, त्याच वर्षी विद्यार्थ्यांना वाटप करते किंवा नाही यावर समाज कल्याण विभागाचे कशा प्रकारे नियंत्रण असते या संबंधित अभिलेख (रेकॉर्ड) संबंधित शाळा व कॉलेज कडून घेण्यात येते काय ? याची योग्य व संपूर्ण माहिती. ८) शासन जी शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांना मंजूर करते ती रक्कम संबंधित कॉलेज व शाळा त्याच वर्षी विद्यार्थ्यांना वाटप केली नसल्यास ती रक्कम तेव्हाच शासनाकडे जमा करण्यात आली किंवा नाही याबाबत समाज कल्याण विभाग कशा प्रकारे नियंत्रण करुन तपास करते याची योग्य व संपूर्ण माहिती. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ३०.५.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली असून प्रथम

अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.८.२००७ रोजी देण्यात आला असून दिनांक २७.८.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता हे स्वतः प्रथम अपीलाचे सुनावणीस हजर होते. सदर अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २१.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/७४१-७४३/२१.१०.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१०९/२००७.**

श्री. राजेंद्र दामोदर खंडारे,
मु. साहित, पो. राहित,
ता. बार्शी टाकळी,
जि. अकोला. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बार्शी टाकळी,
जि. अकोला.

श्री. एम. एम. नालड,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत, हातोला,
ता. बार्शी टाकळी, जि. अकोला. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१०.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांनी हजर राहण्याची सही केली आहे पण सुनावणीस उपस्थित नाही. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. एस. बोकडे, अधिक्षक, पंचायत समिती, बार्शीटाकळी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, हातोला यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. मौजा दोनद बु., दोनद खु., हातोला, टेंभी, साल्पी येथील संपूर्ण ग्रामीण योजने अंतर्गत यशवंत ग्राम योजने अंतर्गत, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत तीन वर्षा पासून पूर्ण माहिती म्हणजेच अंदाजपत्रक, निविदा, संपूर्ण कामाची फाईले. सदरच्या

... २

अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक १६.१.२००७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बार्शी टाकळी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झाला नसल्यामुळे राज्य माहिती आयुक्तांकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक १२.१२.२००६ रोजी ते जनमाहिती अधिकारी नव्हते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा दिनांक १६.१.२००७ रोजी ते प्रथम अपीलीय अधिकारी नव्हते असे सांगितले. परंतु दिनांक १२.३.२००७ रोजी विद्यमान माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, हातोला यांनी अपीलकर्ता यांना पत्राद्वारे त्यांच्या दिनांक २६.१२.२००६ रोजी अर्ज प्राप्त झालेला आहे. अर्जाचे अनुषंगाने माहितीचे शुल्क ३५०/- चा हातोला येथील ग्राम पंचायतीचे माहितीसाठी अतिरिक्त शुल्काचा भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तसेच आपण दोनद बु., दोनद खु., हातोला, साल्पी, टेंभी येथील विविध योजनेची माहिती एकाच अर्जाद्वारे मागितली आहे व ती प्रत्येक ग्राम पंचायतीसाठी वेगवेगळा अर्ज सादर करावा असे सुध्दा कळविलेले दिसून येते व त्याकरिता पोष्टाचा दिनांक १४.३.२००७ रोजीचा पुरावा दाखल त्यांनी सादर केलेला आहे. वास्तविक दिनांक १२.१२.२००६ रोजी अर्ज उपलब्ध झाल्यानंतर ३० दिवसाचे आंत अपीलकर्त यांनी त्यांना मागितलेल्या माहितीचे संदर्भामध्ये तसेच दारिद्र रेषेच्या प्रमाणपत्राच्या संदर्भामध्ये कळविणे आवश्यक होते. परंतु अपीलकर्ता यांना जे कळविण्यात आलेले आहे ते ६० दिवसाचे नंतर कळविण्यात आलेले आहे. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला दिसून येत नाही व त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा खुलासा हा विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेला नाही. यावरुन प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात व अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली असती तर अपीलकर्ता यांना त्याच वेळेस माहिती उपलब्ध करुन देता आली असती. परंतु त्यांनी सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करावे लागले व त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्तीची सुचना असतांना सुध्दा निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांचे विरुध्द तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

... ३

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १२.१२.२००६ च्या अर्जा प्रमाणे हातोला, ग्रामपंचायतीचे संदर्भातील माहिती हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसाचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) मौजा दोनद बु., दोनद खु., टेंभी, साल्पी या ग्राम पंचायतसाठी माहिती करिता स्वतंत्रपणे अर्ज केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) संबंधित जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

४) संबंधित प्रथम अपीलीय अधिकारी यांनी शासनाचे आदेश असतांना सुध्दा प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नसल्यामुळे व निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकरी, जिल्हा परिषद, अकोला यांनी करावी.

५) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २११३/२००७.

श्री. पी. पी. पप्पुवाले,
मु. पो. ता. दिग्रस,
जि. यवतमाळ. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. डी. राठोड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
ता. दिग्रस, जि. यवतमाळ.

श्री. मोहम्मद अय्युब शेख,
जनमाहिती अधिकारी तथा
अध्यक्ष, नगर परिषद कर्मचारी पत संस्था, र.न. ७६५,
ता. दिग्रस, जि. यवतमाळ. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१०.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता सुनावणीस उपस्थित राहण्यास असमर्थ असल्याबाबत त्यांनी त्यांचे निवेदन दिनांक १९.१०.२००८ ला सादर केले आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, नगर परिषद कर्मचारी सहकारी पत संस्था, र.न. ७६५, दिग्रस यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) आपला अपीलीय अधिकारी कोण ? संपूर्ण पत्ता द्यावा. २) खातेदारांचे कर्ज देणे घेणे, खतावणीच्या झेरॉक्स प्रती सन १९८५ ते २००० पर्यंत किंवा संस्था सुरु झाल्यापासून २००० पर्यंत (घेतलेले कर्ज, दिलेले हप्ते, पूर्ण तपशिलासह). ३) मय्यत कर्मचारी अमानुल्लाखां हयांचे कर्ज कोणत्या नियमाने त्यांच्या पत्नीच्या कुटुंब निवृत्ती

वेतनातून कपात केली व आज पर्यंत त्यांचे कुटूंब निवृत्ती वेतनातून किती रक्कम कपात केली. ४) कुटुंब निवृत्ती वेतनातून कपात करण्याबाबत deduction schedule कोणत्या नियमाने केले. जेव्हा अर्जामध्ये पत्नीचा कोणताच संबंध नव्हता. सविस्तर माहिती द्यावी. सदरची माहिती यु.पी.सी.ने घेणार असे नमुद करुन बी.पी.एल. कार्डची सत्यप्रत जोडली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.३.२००७ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.१२.२००६ च्या अर्जानुसार मुद्या क्रमांक १ ते ४ बाबतची माहिती त्यांना पुरवावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. सदरच्या निर्णयाप्रमाणे दिनांक १६.४.२००७ रोजी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जात यु.पी.सी.नी माहिती उपलब्ध करुन द्यावी म्हटले असल्यामुळे यु.पी.सी.नी माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. त्याबद्यलचा पुरावा म्हणून माहिती उपलब्ध करुन देण्याची प्रत व पोष्टाच्या पुराव्याची छायांकित प्रत जोडलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना दिनांक ३.४.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले होते व त्याकरिता अपीलकर्त यांनी दिनांक १९.१०.२००८ रोजी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. तो खालील प्रमाणे आपल्या वरील संदर्भाकिंत पत्रानुसार आपण मला सुनावणीस दिनांक २२.१०.२००८ ला बोलाविले परंतु मी त्या ठिकाणी नागपूरला येण्यास असमर्थ आहो. मी दारिद्रय रेषेखालील गरीब व्यक्ती आहो. जाण्यायेण्याचे पैसे नसल्यामुळे मी माझे बयान पोष्टाने पाठवित आहो. १) मी दिनांक १४.१२.२००६ ला माहिती अधिकारांतर्गत अध्यक्ष/ सचिव, नगर परिषद कर्मचारी सहकारी पत संस्था र. नं. ७६५ दिग्रस, जि. यवतमाळ येथे माहिती विचारली ती मुदतीत मिळाली नाही. २) प्रथम अपीलीय अधिकारी स. निबंधक, स.निबंधक कार्यालय दिग्रस येथे अपील केले. माहिती मिळाली नाही. ३) दिनांक ६.२.२००७ ला मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यवतमाळ येथे अपील केले. माझ्या माहिती अधिकार अर्जाचे अनुषंगाने स.निबंधक दिग्रस व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यवतमाळ हयांनी परस्पर आपली जबाबदारी एकमेकावर ढकलली. ४) स. निबंधक, सहकारी संस्था दिग्रस ता. दिग्रस हयांनी त्याचे पत्र क्र. जा.क्र. सनिदि/वि.१/अपील, दिनांक २.२.२००७ ला पत्र देऊन याबाबत माहिती मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यवतमाळला कळवावे असे पत्रात नमुद केले. ५) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, यवतमाळ हयांचे पत्र क्र. जा. क्र. नियमन मा.अ./अपील/१६८७, दिनांक १२

... ३

फेब्रुवारी २००७ अन्वये पत्र देऊन ही बाब तालुका स्तरीय सहकारी संस्था, दिग्रसचे अधिनस्त असल्याचे कळविले. ६) यानंतर तालुका स.निबंधक सहकारी संस्था, दिग्रस हयांनी दिनांक १२.३.२००७ ला सुनावणीस बोलाविले त्यांनी दिग्रस नगर परिषद कर्मचारी संस्थेला अध्यक्ष/सचिवास निकाल पत्र देऊन माहिती पुरवावी असा आदेश दिला परंतु अद्याप माहिती दिली नाही. ७) दिनांक ५ फेब्रुवारी २००७ ला नगरपरिषद कर्मचारी पतसंस्था दिग्रस हयांनी एक थातुर मातुर पत्र देऊन १५ दिवसात माहिती देण्यात येईल असे कळविले होते. त्यानंतर लागणारी योग्य फी भरणा करावी असे लिहिले होते. फी किती व कोठे भरावी याचा उल्लेख नाही. केवळ जबाबदारी टाळण्यासाठी मध्यंतरी हे पत्र दिले. मी दारिद्रय रेषेखालील असल्याचा पुरावा जोडला होता हे विशेष. अध्यक्ष/सचिव नगर परिषद कर्मचारी पतसंस्था दिग्रस हयांनी कुटुंब निवृत्ती वेतन धारकाकडून नगर परिषद दिग्रस द्वारा कपातीचे पत्रक जोडून कपात केली जी नियमबाहय आहे. त्यामुळे या प्रकरणात वेळकाढू धोरण अवलंबिले आहे असे वाटते. करिता माझे हे बयान अधिकृत समजून या बयानाची कृपया दिनांक २०.१०.२००८ ला नोंद करावी ही विनंती. वास्तविक अपीलकर्ता यांनी यु.पी.सी. ने माहिती मागितली होती व यु. पी. सी. ने माहिती दिनांक १६.४.२००७ रोजी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी वरील खुलाश्यामध्ये त्याबाबतचा उल्लेख करावयास पाहिजे होते परंतु तसा उल्लेख केलेला दिसून येत नाही. मात्र सार्वजनिक प्राधिकरणाने म्हणजे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. आपले उपरोक्त संदर्भीय सुनावणीचे नोटीस संबंधाचे खालील प्रमाण् माहिती सविनय सादर करण्यात येत आहे. श्री. पी. पी. पपुवाले, गवळीपूरा, दिग्रस यांनी संस्थेकडे त्यांचे पत्र दिनांक १४.१२.२००६ अन्वये केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्ज या कार्यालयाकडे सादर केला होता. सदर अर्जान्वये त्यांनी या संस्थेचे मय्यत सभासद श्री. अमानुल्लाखॉ यांचे कर्जा संबंधाने माहिती मागितली होती. श्री. पी. पी. पप्पुवाले हे या संस्थेचे भागधारक सभासद नसल्याने तथा ही संस्था नगर परिषद कर्मचारी सहकारी संस्था असल्याने संस्थेस शासकीय अर्थ सहाय्य प्राप्त नसल्याने तसेच माहिती अधिकार या संस्थेस लागू आहे किंवा नाही त्यांना माहिती देता येईल किंवा कसे याबाबत मार्गदर्शन मागविणे बाबत मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दिग्रस यांना संस्थेचे पत्र दिनांक १८ डिसेंबर, २००६ अन्वये मार्गदर्शन मागविण्यात आले होते त्यांची प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दिग्रस यांचेकडे श्री. पप्पुवाले यांनी अपील केले असल्याने मा.

... ४

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दिग्रस यांनी त्यांचे पत्र क्र. सनिदि/लि १/माअअ/५०५/०७, दिनांक २६.२.२००७ अन्वये दिनांक १२.३.२००७ सुनावणीत हजर राहणेबाबत संस्थेस सुचित केले होते त्यांची झ ेरॉक्स प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. संस्थेस मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दिग्रस यांनी त्यांचे पत्रक सानिदि/वि/ मा.अ. २९७/२००७, दिनांक २.२.२००७ अन्वये संस्थेच्या दिनांक १८.१२.२००६ चे संदर्भीय पत्रास अनुसरुन श्री. पी.पी. पप्पुवाले हे संस्थेचे सभासद नसेल तरी त्यांना लागणारी माहिती पुरवावी असे संस्थेस निर्देश दिले होते. त्यांची झेरॉक्स प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने संस्थेने श्री. पी. पी. पप्पुवाले यांना त्यांचे पत्र दिनांक १४.१२.२००६ चे अनुषंगाने कळविण्यात आलेली संस्थचे रेकॉर्ड बाहेरगावी अनिष्ट तफावत शोंधण्याचा करिता दारव्हा येथे पाठविण्यात आले असल्याने १५ दिवसात माहिती देण्यात येईल असे कळविण्यात आले होते. त्याची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. मा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दिग्रस यांनी श्री. पी. पी. पप्पुवाले यांना त्यांचे दिनांक ३०.३.२००७ अन्वये अपीलावर निर्णय देऊन संस्थेने श्री. पी. पी. पप्पुवाले यांना त्यांचे दिनांक १४.१२.२००६ अन्वये १ ते ४ मुद्या बाबतची माहिती त्यांना पुरवावी असे या संस्थेस निर्देश दिले त्यांची झेरॉक्स प्रत जोडली आहे. मा. सहाय्यक निबंधक दिलेल्या निर्देशानुसार संस्थेने माहिती यार करुन श्री. पी. पी. पप्पुवाले दिग्रस यांनी पोष्टाचा दाखला घेऊन त्यांनी संस्थेस माहिती यु.पी.सी. ने पाठविणे बाबत सुचविले असल्याने यु.पी.सी. ने संस्थेचे पत्र दिनांक १६.४.२००७ अन्वये पोष्टाने विनामुल्य पाठविण्यात आलेली आहे. सोबत पोष्ट यु.पी.सी. पावती झेरॉक्स जोडली आहे. त्याची प्रत मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, दिग्रस यांना माहिती करिता सादर केली होती. संस्थेने श्री. पी. पी. पप्पुवाले यांना माहिती या पूर्वीच पाठविली असल्याने संस्थे विरुध्द कोणतीही कार्यवाही होऊ नये ही नम्र विनंती. व त्या खुलाश्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २२.१०.२००८**

HIREKHAN/BHUJI/७४७-७५०/२२.१०.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१२५/२००७.

सौ. रजनी श्याम तायडे,
रा. कोठारी वाटिका नं. ७,
मलकापूर रोड,
जिल्हा अकोला. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक,
अकोला.

श्री. आर. एस. पातोंड,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
शहर विभाग, अकोला. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१०.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक १४.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती विना अनुमती गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ११.१२.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, अकोला यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. पोलीस स्टेशन, सिव्हील लाईन, अकोला गुन्हा क्रमांक ३०४१/०४ कलम ५०६, ३४ भादवि व कलम ३(१) (१०) ॲट्रोसिटी ॲक्टचा दाखल असतांना व पुरावा असतांना आरोपीला कां अटक केली नाही व कोर्टात दोषारोप कां पाठविले नाही. याबाबत माहिती द्यावी व आरोपी विरुध्द काय व केंव्हा कार्यवाही करणार तसेच कार्यवाहीला विलंब करणाऱ्या तत्कालीन अधिकाऱ्यां विरुध्द काय कार्यवाही कराल याबाबत माहिती द्यावी ही माहिती ७ दिवसात द्यावी. माहितीचा कालावधी

... २

दिनांक २१.२.२००४ ते ११.१२.२००६ पर्यंत असा दिसून येतो. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.१२.२००६ रोजी अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीची पोच पावती सुध्दा दिनांक २९.१२.२००६ रोजी अपीलकर्ती यांनी दिलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक ९.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.२.२००७ रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे प्रथम अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ती यांनी मागितलेल्या माहितीत उल्लेख केलेल्या तक्रारी संबंधामध्ये चार्जशिट दाखल करण्याचा आदेश होणेबाबत संबंधित अधिकाऱ्यां विरुध्द कार्यवाही होणे बाबत विनंती केलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांनी दिनांक २२.१२.२००६ रोजी त्यांचे माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती संपूर्ण उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तक्रारी प्रमाणे चार्जशिट दाखल करण्याच्या संदर्भामध्ये आदेश देणेबाबत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीमध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद नाही व त्यामुळे अपीलकर्ती यांच्या द्वितीय अपीलातील विनंती मान्य करता येत नाही व त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांनी दिनांक ११.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व द्वितीय अपीलातील त्यांची विनंती मान्य करता येत नसल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

**दिनांक :- २४.१०.२००८**

HIREKHAN/BHUJI/७५१-७५२/२४.१०.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१२८/२००७.

श्री. सुरेश माणिकराव भारसाकळे,
द्वारा- गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, अमरावती. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. डब्ल्यु. दिवाण,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
(पंचायत विभाग),
जिल्हा परिषद, अमरावती.

जनमाहिती अधिकारी तथा
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, दर्यापूर,
जि. अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१०.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. डी. अंबुलकर, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.८.२००६ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दर्यापूर यांचेकडे खालील पाच मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. १) अर्जदार श्री. एस. एम. भारसाकळे यांचे दिनांक १.१२.२००२ ते ८.१२.२००२ या कालावधीतील वेतन/निलंबन भत्ता देण्याबाबत गटविकास अधिकारी, धामणगांव यांचेद्वारे गट विकास अधिकारी, दर्यापूर यांना दिनांक ११.३.२००३ चे पत्राची प्रतिलिपी व दिनांक ३१.३.२००३ चे पत्र पाठविले. त्यानुसार सदर वेतन काढले किंवा

... २

नाही याबाबत माहिती. वेतन काढले नसल्यास त्याबाबत कारणे व वेतन/निर्वाह वेतन केंव्हा काढले जाईल याची माहिती. २) विस्तार अधिकारी श्री. बी. ए. जवंजाळ यांनी अर्जदारा संबंधी दिनांक २२.१२.२०००, दिनांक १६.१.२००१, दिनांक २३.१.२००१ या तारखेला अहवाल सादर केले त्याबाबत मुळ कार्यालयातील प्रत अवलोकनास उपलब्ध करुन द्यावी व नंतर त्यावरुन सत्यप्रती प्रमाणित करुन दयाव्यात. तसेच सदर अहवाला संबंधी गट विकास अधिकारी यांचे चौकशी आदेशाच्या प्रती देण्यात याव्या. चौकशी आदेशाचे जावक क्रमांक व प्राप्त अहवालाचे आवक क्रमांकाची माहिती दयावी. यासंबंधी पंजी अवलोकनास उपलब्ध व्हावी. ३) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता १९६८, नियम ५१ नुसार प्रपत्र क्र. १२ ही देयकाची नोंदवही एप्रिल २००० ते डिसेंबर २००२ या कालावधी पर्यंत तपासणीकरिता उपलब्ध करुन दयावी. ४) अर्जदाराने दिनांक ४.११.२००० ला ग्राम पंचायत पेठ इतवारपूर येथील गैरव्यवहारासंबंधी तक्रार दाखल केली होती. त्यासंबंधी चौकशी केली असल्यास चौकशी अहवाल प्राप्त व्हावा. सन १९९९-२००० मधील चांदूर जहानपूर येथील रस्ता बांधकामाचे प्राकलन व पेठई तवारपूर येथील नाली बांधकामाचे प्राकलन व काम पूर्ण दर्शविल्यास पुर्णत्व प्रमाणपत्र संबंधितांकडून प्राप्त करुन देण्यात यावे. ५) ग्रामसेवक श्री. कळमकर यांची डिसेंबर २००० मधील दैनंदिनीची सत्यप्रत. वरील सर्व माहिती सत्यप्रतित/ लिखित स्वरुपात उपलब्ध व्हावी व माहिती संबंधी मागणी केलेले दस्तऐवज तपासणीकरिता उपलब्ध करुन दयावे. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २१.९.२००६ रोजी अपीलकर्ता यांना ५ मुद्यांवर माहिती कळवून उर्वरित माहितीकरिता माहितीचा खर्च व टपाल खर्च म्हणून रुपये ९२/- चा भरणा करावा असे यु.पी.सी.ने कळविण्यात आल्याचे दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरचे पत्र त्यांना मिळाले नाही. त्यामुळेच त्यांनी दिनांक २६.१०.२००६ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी व निर्णय दिनांक १९.१.२००७ रोजी झाला असून जनमाहिती अधिकारी यांचे स्तरावर उपलब्ध झालेल्या १२ मुद्यांच्या अनुषंगाने रेकॉर्ड त्यांना देण्यात आला व दिनांक २५.१.२००७ चे पत्रान्वये अपील निकाली काढण्यात आले असे दिसून येते. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भात अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध करुन घेतांना ती तपासून घेतली अशी पोच दिलेली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणली तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की,

त्यांना मुद्या क्रमांक १ नुसार पत्राची प्रत उपलब्ध झाली नाही. सदरच्या पत्राची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिली नाही असे त्यांचे म्हणणे असले तरी प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या माहितीवर कोणत्याही प्रकारे प्रमाणित म्हणून उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी ती छायांकित प्रत प्रमाणित करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या छायांकित प्रती त्यांना प्रमाणित देण्यात याव्या. तसेच अपीलकर्ता यांनी ज्या अहवालाचे अवलोकन मागितले होते त्या अहवालाचे अवलोकन करण्यासाठी अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ कळवावी व त्या तारखेस सदरच्या अहवालाचे अवलोकन करावे. जनमाहिती अधिकारी यांनी सदरची कागद पत्रे त्यांना अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावी व जी माहिती उपलब्ध झाली नाही ती त्यांना पुन्हा छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २४.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/७५३-७५५/२४.१०.२००८

**राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २१३१/२००७.**

श्री. अनिल चिंतामण खरे,
उज्वल फ्लॅट्स, फ्लॅट नं. सी- ००७,
राहाटे कॉलनी, वर्धा रोड,
नागपूर - ४४० ०२२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
धर्मदाय उपआयुक्त,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. ए. आर. धेटे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१०.२००८)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.७.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१०.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००७ रोजी माहिती अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक संस्था, संस्था नोंदणी कायदा १८६०, सिव्हील लाईन, नागपूर. यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. Present executive Committee of Vidarbha Cricket Association, Nagpr is holding the position as per the Approved Constitution or not, If not from which year the Present executive Committee of V.C.A. is holding illegal states. सदरच्या

अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.२.२००७ रोजी माहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांनी विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर या संस्थेबाबत मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी नोंदणी संबंधी आदेश पारित केला असून त्या आदेशा विरुध्द मा.धर्मादाय सह आयुक्त, नागपूर यांचेकडे अपील दाखल झाले असून त्यावर स्थगनादेश देण्यात आलेला आहे. अशा परिस्थितीत सदर प्रकरण हे न्याय प्रविष्ट असल्यामुळे यावर भाष्य करणे उचित होणार नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी धर्मादाय उपआयुक्त, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.४.२००७ रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे असा निर्णय देऊन अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली दिसून येते ती अभिप्रायात्मक प्रश्नाचे स्वरुपात मागितली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(च) मध्ये सार्वजनिक प्राधिकरणामध्ये जी माहिती साहित्याच्या स्वरुपात उपलब्ध असते उदा. अभिलेख, दस्तऐवज, कागदपत्रे, टिप्पणी इत्यादी स्वरुपात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची छायांकित प्रत उपलब्ध करुन घेणे असा माहितीचा अधिकार आहे. असे असले तरी सदरची मागितलेली माहितीच्या प्रमाणे विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूरच्या संदर्भामध्ये सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्टच्या तरतुदी प्रमाणे माहिती मागितलेली असल्यामुळे त्याबाबत जर जनमाहिती अधिकारी यांचेकडे कागदपत्रे, अभिलेखाच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असेल तर त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. कोणत्याही प्रकारे जनमाहिती अधिकारी यांनी अभिमत देणे हे अपेक्षित नाही. जनमाहिती अधिकारी हा त्यांचे स्तरावर उपलब्ध असलेल्या माहितीच्या अभिलेखाचा परिरक्षक असतो. उपलब्ध झालेल्या माहितीतून निर्णयाचे संदर्भामध्ये तो निर्णय प्रक्रियेतील अधिकारी असेल असे नाही व त्यामुळेच कोणत्याही प्रकारचे अभिमत हे अधिनियमाचे तरतुदी प्रमाणे अपेक्षित नाही. मात्र अपीलकर्ता यांना दिनांक ८.२.२००७ रोजी जे उत्तर देण्यात आलेले दिसून येते व त्यातील दिनांक ४.१२.२००६ च्या नोंदणी संबंधी आदेशाचा उल्लेख केलेला दिसून येते. त्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा आदेश हा मुंबई सार्वजनिक

... ३

विश्वस्त, १९५० च्या संदर्भातील आहे व त्या आदेशाचे विरुध्द धर्मादाय सहआयुक्त यांचेकडे अपील दाखल केलेले असून त्यामध्ये अर्जदाराने माहिती मागितल्यानंतर स्थगनादेशाचे आदेश झाला आहे. तसेच २००८ मध्ये सुध्दा धर्मादाय सहआयुक्त यांनी सदरच्या आदेशाच्या संदर्भामध्ये काही मुद्दे कायम ठेवून काही मुद्यांवर धर्मादाय सहआयुक्त यांचेकडे पुन्हा सुनावणी पाठविलेले दिसून येते व त्यामुळेच सदरच्या प्रकरणी हे न्याय प्रविष्ट आहे व माहिती देता येणार नाही असे उत्तर दिलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट व मुंबई सार्वजनिक विश्वस्त ॲक्ट अशा प्रकारचा फरक केलेला दिसून येत नाही. मात्र सदर संस्थेची नोंदणी करण्याचे आदेशाचे विरुध्द धर्मादाय सहआयुक्त, नागपूर यांच्याकडे अपील प्रलंबित असल्यामुळे सदरच्या बाबत भाष्य करणे उचित नाही. या उत्तराशी अनुलक्षून संपूर्ण निर्णय झालेला दिसून येतो. प्रथम अपीलाचे निर्णयातील परिच्छेद क्रमांक ५ मुद्दे सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट च्या संदर्भामध्ये उल्लेख केलेला दिसून येतो. परंतु त्या प्रमाणे मुद्दा निर्णयासाठी काढलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट १८६० च्या तरतुदी प्रमाणे विदर्भ क्रिकेट असोसिएशनची कार्यकारी मंडळाचे संदर्भामध्ये सहाय्यक निबंधक संस्था यांच्याकडे माहिती उपलब्ध असल्यास त्याबद्यलची माहिती पुरविणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट प्रमाणे विदर्भ क्रिकेट असोसिएशन हे पूर्वीच पंजीबध्द झाला आहे व त्यामुळेच त्यांनी तशा प्रकारची माहिती मागितली होती. अपीलकर्ता यांनी आयोगाचे निदर्शनास सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांच्या कडील किरकोळ अर्ज १८६९/२००१ मध्ये दिनांक ३०.१२.२००२ रोजी पारित केलेल्या आदेशाची प्रत निदर्शनास आणली. सदरच्या आदेशामध्ये अनुसूची A मध्ये नोटीस दिलेला आहे व त्या नोटीसीमध्ये ५ आदेशांचे निर्णय सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्ट १८६० च्या तरतुदी प्रमाणे विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश केल्याचे दिसून येतात व हीच बाब अपीलकर्ता यांना अपेक्षित दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांच्या दिनांक २९.१.२००७ च्या अर्जामध्ये मागितलेली माहिती ही सदरच्या आदेशाचे संदर्भात आहे असे दिसत असल्यामुळे त्या आदेशाची प्रतिपुर्ती झालेली असल्यास त्या संदर्भातील विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना नोटिसीप्रमाणे प्रतिपुर्ती केली असल्यात त्या कागदपत्राची छायांकित प्रती व तसेच त्यावर निबंधक संसथा यांनी दिलेल्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व तशी उपलब्ध नसल्यास त्याबाबतची माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २९.१.२००७ च्या अर्जामध्ये सोसायटी रजिष्ट्रेशन ॲक्टच्या संदर्भामध्ये विदर्भ क्रिकेट असोसिएशन या संस्थेचा दर्जा काय आहे याबद्यलची माहिती उपलब्ध असल्यास छायाकिंत प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्या पासून २० दिवसाचे आंत विनामुल्य रजिष्टर पोष्टाने पुरविण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३१.१०.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

HIREKHAN/BHUJI/७५६-७५९/३१.१०.२००८